# लोकमंगल विज्ञान व उद्योजकता महाविद्यालयांमध्ये सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी

श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल विज्ञान उद्योजकता महाविद्यालयांमध्ये दिनांक ०३ जानेवारी रोजी सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली. सुरुवातीला सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यीनी कु. रूतुजा वडशिंगकर व कु. मिताली पवार यांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला वंदना सादर केली. त्यानंतर महाविद्यालयाची विद्यार्थीनी कु. प्रतिक्षा भोसले हिने कार्यक्रमाचे प्रस्तावित केले. यावेळी बऱ्याच विद्यार्थ्यांनी सदर कार्यक्रमाच्या निमित्ताने आपले मनोगत व्यक्त केले. त्यानंतर महाविद्यालयातील प्रा गौतम जाधव व प्रा स्नेहा हगरगुंडगी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून जैवतंत्रज्ञान विभागाचे प्रमुख डॉ. सतिश कुमार देवकर सर उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी प्रा अंकुश गोरट्याल, प्रा समाधान कदम, प्रा विनय समलेटी, प्रा भारती जाधव, प्रा कविता संभारम, प्रा स्नेहल मठे, प्रा शितल भोजणे, प्रा अमृता जगताप, आदी शिक्षक - शिक्षकेतर व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.







